# खानदेशातील मातंग समाजाची आर्थिक सुरक्षा एक अभ्यास

**प्रा. बाळकृष्ण एम. तायडे**
जिजामाता कला विज्ञान व
वाणिज्य महाविद्यालय, नंदुरबार
संरक्षण व सामरिक शास्त्र विभाग

**प्राचार्य डॉ. एस. पी. बडगुजर**
विकास महाविद्यालय, शहादा

**प्रस्तावना :-**

विज्ञान-तंत्रज्ञानाचा विकास, आंतरराष्ट्रीय पातळीवरील बदल आणि आर्थिक विकासाला आलेले जागतिक महत्त्व व त्यातून निर्माण झालेले प्रश्न यामुळे राष्ट्रीय सुरक्षा संकल्पनेकडे बघण्याच्या दृष्टिकोनात बदल झाला. आज राष्ट्रीय सुरक्षा संकल्पनेचे अंतर्गत व बहिर्गत दोघांबरोबरच लष्करी घटकांचाही धोका म्हणून समावेश करण्यात आला आहे. या अलष्करी समस्या राष्ट्रीयसुरक्षेचे गंभीर धोके म्हणून उदयाला आल्या आहेत व लष्करी घटक राष्ट्रीय सुरक्षा संकल्पनेत समाविष्ट केल्यामुळे सुरक्षा संकल्पनेचा परीघ विस्तारला असून ही संकल्पना व्यापक आणि बहुआयामी बनली आहे.

आज देशाच्या सुरक्षेला अंतर्गत व बहिर्गत या पारंपरिक धोक्यापेक्षा अलष्करी घटकांपासून फार मोठा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे राज्यकेंद्रित व लष्कराधिष्टीत सुरक्षा संकल्पनेत बदल होऊन ती आता लोकविकासाशी संबंधित (मानवकेन्द्रित) मानवी सुरक्षा संकल्पना म्हणून उदयाला आली आहे.

आज राष्ट्राला असलेल्या लष्करी धोक्याचे प्रमाण कमी झाले असून राजकीय व अलष्करी घटकांनी राष्ट्राच्या सुरक्षेला फार मोठे आव्हान निर्माण केले आहे. या अलष्करी घटकांची / धोक्याची सूची लांबलचक असली तरी त्यात सर्वमान्य अशा आर्थिक सुरक्षा, अन्नसुरक्षा, राजकीय सुरक्षा, सामाजिक सुरक्षा, लिंग सुरक्षा, पर्यावरणीय सुरक्षा, व्यक्तिगत सुरक्षा व आरोग्य सुरक्षा या तत्त्वांचा समावेश करण्यात आला आहे. या तत्त्वांपैकी खानदेशातील मातंग समाजाची आर्थिक सुरक्षा अभ्यासाला घेतली आहे.

**संशोधनाचा उद्देश :-**

१. मानवी सुरक्षेतील आर्थिक घटकांचे महत्त्व अभ्यासणे.

२. खानदेशातील मातंग समाजाच्या आर्थिक सुरक्षेचा अभ्यास करणे.

३. मातंग समाजाच्या आर्थिक सुरक्षेतील समस्या जाणून घेणे.

**मानवी सुरक्षा :-**

आजच्या जागतिकीकरणाच्या आधुनिक युगात आर्थिक घटकांना महत्त्व आल्यामुळे प्रत्येक राष्ट्र आपल्या देशाच्या विकासासाठी धडपड करीत आहेत. त्यासाठी विविध योजना व उपक्रम राबवून राष्ट्र विकासाचे ध्येय साधण्याचा प्रयत्न करताना दिसतात. परंतु हे प्रयत्न करीत असताना दुसऱ्या बाजूला देशातील नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे देशातील नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहेत. यात शिक्षण, दारिद्र्य आरोग्य, बेरोजगारी व स्थलांतर इत्यादी

समस्यांचा त्यात समावेश होतो. या समस्या त्या नागरिकांच्या आर्थिक सुरक्षेशी म्हणजेच मानवी सुरक्षेसंबंधित आहेत.

कोणत्याही देशातील नागरिकांच्या अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजांच्या पूर्ततेबरोबरच आरोग्य सुविधांची हमी आणि भयापासून मुक्तता म्हणजे मानवी सुरक्षा होय.

१) संयुक्त राष्ट्रसंघाच्या १९९४ च्या मानवी विकास अहवालात मानवी सुरक्षाही शस्त्रास्त्रांशी संबंधित संकल्पना नसून तर ती मानवी प्रतिष्ठा आणि मानवाच्या अस्तित्वाची संकल्पना आहे, हे स्पष्टपणे नमूद केले आहे.

२) संयुक्त राष्ट्रसंघाचा मानवी विकास अहवाल १९९४ यात मानवी सुरक्षेची सात तत्वे नमूद केले आहेत. त्यात आर्थिक सुरक्षा, अन्नधान्य सुरक्षा, सामाजिक सुरक्षा, राजकीय सुरक्षा, पर्यावरणीय सुरक्षा, वैयक्तिक सुरक्षा व आरोग्य सुरक्षा इत्यादींचा समावेश आहे.

**अन्नसुरक्षा :-**

अन्न ही सर्वच सजीव प्राण्यांची व मानवाची मूलभूत गरज आहे. सकस, पुरेसे अन्न मिळणे, हे व्यक्तीच्या शारीरिक आणि मानसिक कार्यक्षमतेसाठी आवश्यक असते. म्हणून प्रत्येक व्यक्तीस कार्य करण्यासाठी ऊर्जा मिळणे एवढे अन्न त्याला प्राप्त होणे अपेक्षित आहे. व्यक्तीला अन्नाची गरज पूर्ण करता यावी, यासाठी रोजगार व पुरेसा आर्थिक स्त्रोत उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. अन्न सुरक्षेला सर्वाधिक धोका हा अन्नधान्यातील घट, साठवणूक, नासाडी, वाढती लोकसंख्या तसेच अन्नधान्यातील भेसळ, अभाव व अन्नधान्यातील पोषक तत्वाच्याया अभावापासून उद्भवतो.

**सामाजिक सुरक्षा :-**

भारतासारख्या देशात व्यक्तीला त्याचे कुटुंब, धर्म, जात व जातीसमूह यापासून सुरक्षा प्राप्त होते. जातीय, धार्मिक, वांशिक दंगलीमुळे सामाजिक सुरक्षा धोक्यात येत असते.

**राजकीय सुरक्षा :-**

प्रत्येक देशातील नागरिकांना त्यांचे राजकीय हक्क व सामाजिक प्रतिष्ठा मिळणे हे राजकीय सुरक्षेत अभिप्रेत आहे. जगात कमी-अधिक प्रमाणात नागरिकांना राजकीय क्षेत्रातील अराजकता, दबाव, शारीरिक व मानसिक छळ आणि प्रशासनाची उदासीनता या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. यामुळे प्रत्येक नागरिकांची राजकीय सुरक्षा प्रभावित होताना दिसते.

**पर्यावरणीय सुरक्षा :-**

प्रत्येकाला आरोग्यवर्धक आणि पोषक वातावरण मिळणे पर्यावरणीय सुरक्षेत अभिप्रेत आहे. मानवी गरजांच्या हव्यासापोटी माणूस निसर्गाचे शोषण करीत आलेला आहे. मानवाच्या बदललेल्या जीवनशैलीमुळे मानवाचा पर्यावरणातील हस्तक्षेप वाढून त्यातून पर्यावरणीय अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडून वातावरणातील तापमानात वाढ होत आहे. वातावरणात कार्बन डायॉक्साईडचे प्रमाण वाढून ओझोन वायू पातळ झाला आहे. इ. अनेक समस्यांमुळे मानवी आरोग्याच्या समस्या वाढ होताना दिसते.

**आरोग्य सुरक्षा :-**

प्रत्येक व्यक्तीला किमान आरोग्याची हमी मिळावी, हे आरोग्य सुरक्षेत अभिप्रेत आहे. आज विकसित आणि विकसनशील देशात संसर्ग आजारांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. तर गरीब देशांमध्ये ८० टक्के मृत्यू हे आरोग्याच्या असुविधांमुळे होतात. भूकबळी, गरिबी,अस्वच्छता हे आरोग्य सुरक्षेसाठी धोकेदायक आहेत. त्यासाठी प्रत्येक व्यक्तीला पुरेशा आरोग्य सुविधा, शुद्ध जल, आरोग्य समस्याविषयी जनजागृती निर्माण करणे गरजेचे आहे.

**वैयक्तिक सुरक्षा :-**

प्रत्येक व्यक्तीची शारीरिक हिंसेपासून सुरक्षा म्हणजेच वैयक्तिक सुरक्षा होय. राष्ट्र, राज्य आणि इतर संघर्षाच्या वेळी वैयक्तिक सुरक्षा धोक्यात येते. त्याचबरोबर व्यसनाधिनता, आर्थिक विपन्नावस्था आणि नैराश्य यातून व्यक्तीची वैयक्तिक सुरक्षा धोक्यात येते. त्यासाठी कायदा-सुव्यवस्था, आर्थिक साधने आणि आनंददायी जीवन मानवी सुरक्षा नुसार प्रत्येकाला मिळणे वैयक्तिक सुरक्षेसाठी आवश्यक आहे.

**आर्थिक सुरक्षा :-**

प्रत्येक व्यक्तीला खात्रीचे उत्पन्न मिळणे हे आर्थिक सुरक्षेत अभिप्रेत आहे. देशातील नागरिकांना आर्थिक मिळकत प्रामुख्याने स्वयंरोजगार, वेतन, मानधन किंवा स्वयंसेवी वित्तीय संघटनांकडून प्राप्त होत असते. परंतु यातून मिळणारे उत्पन्न पायाभूत सुविधांसाठी पुरेसे नसेल तर त्या व्यक्तीला असुरक्षित वाटत असते. आर्थिक सुरक्षेला सर्वात मोठा धोका हा रोजगारात होणारी घट किंवा कपात, अपुरे वेतन, मानधन, रोजगाराच्या ठिकाणी असलेले असुरक्षित वातावरण आणि व्यापक धोरणांच्या अभावातून निर्माण होत असतो. आज जगातील २५ टक्के लोकच आर्थिक सुरक्षा दृष्टिकोनातून सुरक्षित असल्याचे दिसून येतात. आर्थिक सुरक्षेतून व्यक्तीचा सर्वांगीण विकास घडून येत असतो. आर्थिक सुरक्षेतूनच व्यक्तीला आपला सामाजिक दर्जा व प्रतिष्ठा प्राप्त करता येत असते किंवा त्यात वाढ करता येते.

देशातील नागरीक आर्थिकदृष्ट्या सुरक्षित नसतील तर त्यामुळे मोठ्या प्रमाणात दारिद्र्यात, बेरोजगारी व गुन्हेगारी यांच्यात वाढ होऊन नागरीकांची वैयक्तिक सुरक्षा व सामाजिक सुरक्षा धोक्यात येते. या दोघांचे स्वरूप व्यक्ती किंवा एखाद्या समाजापुरते मर्यादित न राहता, त्याचा प्रभाव राष्ट्राच्या सुरक्षेवर पडत असतो. म्हणूनच मानवी सुरक्षित लोक विकासाला प्रथम प्राधान्य देण्यात आले आहे. अनेक राष्ट्रांनी मानवी सुरक्षेच्या या तत्वावर आधारित आपल्या राष्ट्राच्या विकासाचे आणि सुरक्षेचे ध्येय, धोरणे व त्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. भारतानेही मानवी सुरक्षेची संकल्पना स्वीकारलेली आहे.

**मातंग समाज :-**

भारताच्या विविध घटक राज्यात मातंग समाज रहिवासाला असून महाराष्ट्रात प्रामुख्याने तो मोठ्या प्रमाणात केंद्रित झाला आहे. महाराष्ट्रातील ५८ अनुसूचित जातीपैकी एक जात म्हणजे मातंग समाज होय. हिंदू धर्मातील सर्वात कनिष्ठ आणि अस्पृश्य जात म्हणून मातंग समाजाकडे पाहिले जाते. केरसुन्या, दुरड्या, टोपल्या, दोरखंड आणि मंगल प्रसंगी वाजंत्री वाढवणे ही पारंपरिक कामे या समाजाची असून ते एक उदरनिर्वाहाचे साधन या समाजाकडे होते. कालपरत्वे या समाजातील काही लोकांनी वेगवेगळे व्यवसाय स्वीकारल्यामुळे व्यवसायानुसार हा एकसंघ समाज अनेक उपजाती, पोटभेदामध्ये विभागला गेला आहे.

विज्ञान-तंत्रज्ञानाचा विकास व त्यातून विस्तारलेल्या औद्योगिकीकरणातून पारंपरिक उत्पन्नाच्या साधनांमध्ये बदल झाला. पारंपरिक व्यवसाय बदलले, त्यातुन ब्राह्मण या वर्णाव्यतिरिक्त असलेले वर्ण नाहीसे झालेत. परंतु भारतातील जातीचे अस्तित्व मात्र कायम राहिले. या जातींनी आधुनिकीकरणावर स्वतःला बदलविले. पारंपरिक व्यवसायाला त्याग केला. त्यांना राष्ट्राच्या विकासाच्या प्रवाहात सामावून जाण्याची संधी मिळाली. त्यांचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय विकास काही प्रमाणात तरी घडून आला. परंतु स्वातंत्र्यानंतरच्या काळातही मातंग समाज आपल्या पारंपरिक व्यवसायाला चिकटून राहिला. त्यामुळे या समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकासावर मर्यादा पडल्या. तो आजही राष्ट्र विकासाच्या मुख्य प्रवाहापासून कोसो दूर लांब दिसतो. त्यातून तो आर्थिकदृष्ट्या सुरक्षित दिसून येत नाही. मातंग समाजाच्या आर्थिक विकासातील अडचणीचा शोध घेणे व त्यावर काही उपाययोजना सुचविणे, यासाठी खानदेशातील ३६० कुटुंबाच्या आर्थिक साधनांची मुलाखत अनुसूचीद्वारे माहिती घेण्यात आली, ती पुढीलप्रमाणे.

**मातंग समाज कुटुंबातील उत्पन्नाची साधने (सारणी)**

| अ.क्र. | तपशील | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | हातमजुरी | १३४ | ३७.२ |
| २ | शेतमजुरी | ७३ | २०.३ |
| ३ | स्वतःचा | १३९ | ३८.६ |
| ४ | नोकरी | १४ | ०३.९. |
| | **एकूण** | ३६० | १०० |

(स्त्रोत : मुलाखत अनुसूची)

मातंग समाजाला अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजांच्या पूर्ततेसाठी खात्रीशीर असे खाजगी उत्पन्नाचे साधन उपलब्ध दिसून येत नाही. व्यवसायाने फक्त व्यक्तीचे उत्पन्न नाही तर त्याच्या जीवनमानाची पातळी, सामाजिक प्रतिष्ठाही निर्धारित होत असते. यावर जीवनमानाच्या पातळीच्या जीवनशैलीवर परिणाम होत असतो. सामाजिक प्रतिष्ठेवर त्या समाजाच्या विषयाच्या जाणीवा आणि भावना यांचा ताळमेळ आधारित असते. पर्यायाने व्यक्तीच्या आर्थिक सुरक्षेत व्यवसायाचे योगदान मौलिक असते. त्यावरून व्यक्तीची आर्थिक सुरक्षाविषयक स्थिती कळत असते.

साधारणपणे मातंग समाजात सर्वात जास्त पारंपारिक व्यवसायातील प्रमाण हे ३८.६ टक्के आहे. म्हणजेच मातंग जाती समूहाने पारंपरिक व्यवसाय मोठ्या प्रमाणात सोडलेले आहे. परंतु त्याऐवजी हातमजुरी, शेतमजुरीचे कामे स्वीकारलेली आहेत. जवळपास हे प्रमाण ५७.५ टक्के पर्यंत आहे. तर खात्रीशीर उत्पन्नाचे साधन म्हणून नोकरी व्यवसायाकडे बघितले जाते. त्यात या समाजाचे प्रमाण फारच

अल्प म्हणजेच ३.९ टक्के एवढेच आहे. जवळपास ९६ टक्के मातंग समाज हा विविध क्षेत्रात काम करीत असला तरी ते स्त्रोत अल्प उत्पन्न देणारे आहेत. त्या उत्पन्नातून या समाजाच्या अन्न, वस्त्र, निवारा व आरोग्य या मूलभूत गरजा पूर्ण होतील एवढे उत्पन्न मात्र यातून मिळत नाही. त्यामुळे या गरजांच्या पूर्ततेसाठी त्याला कर्ज काढण्यासाठी किंवा घरातील काही मौल्यवान वस्तू असतील तर ती विकण्याची ही वेळ येत असते.

जागतिकीकरणाच्या रेट्यात या समाजाच्या पारंपरिक व्यवसायात भांडवलदारांचा प्रवेश झाल्यामुळे हे पारंपारिक व्यवसायाचे प्रमाण कमी होताना दिसते. त्यामुळे मातंग समाज आर्थिक विवंचनेत मोठ्या प्रमाणात सापडला असून त्याचा परिणाम या समाजात दारिद्र्याचे प्रमाणात घट न होता त्यात वाढ होताना दिसते. जे तरूण आपल्या आर्थिक परिस्थितीवर मात करून पारंपरिक शिक्षणात उच्चशिक्षित झाले आहेत, त्यांनाही रोजगाराच्या संधी सहज उपलब्ध होत नसल्यामुळे या समाजातील तरुणांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात दिसून येते. या सर्व परिस्थितीच्या नकारात्मक परिणाम या समाजाच्या सर्वांगीण विकासावर होत असून या समाजाची प्रतिष्ठा सामाजिक दर्जा प्रभावित होताना दिसतो.

सारांश, एकंदरीत मातंग समाज आर्थिकदृष्ट्या सुरक्षित आहे. एकीकडे भारताचा महासत्तेकडे वाटचाल चालू असताना लाखोंच्या संख्येने रहिवाशाला असलेल्या मातंग समाजाला आर्थिक सुरक्षे'पासून वंचित ठेवणे हे राष्ट्राच्या सुरक्षेच्या आणि शांततेच्या दृष्टीने धोकेदायक ठरू शकते.

**निष्कर्ष :-**

१. स्वातंत्र्यानंतरच्या काळातही मातंग समाज पारंपरिक व्यवसायात गुंतून राहिला. ज्याद्वारे अल्प उत्पन्न मिळत राहिले. परंतु त्यामुळे आर्थिक विकासावर मर्यादा पडल्यात.

२. वस्तू विक्रीसाठी गावोगावी फिरावे लागते, त्यामुळे घरातील मुलामुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे शाळेतील गळतीचे प्रमाण वाढले. त्यातून ही मुले आपल्या आई-वडिलांच्या पारंपरिक व्यवसायात गुंतलेली दिसून येतात.

३. खात्रीशीर आर्थिक उत्पन्नासाठी व्यावसायिक शिक्षण घेणे महत्त्वाचे असते. परंतु या समाजातील तरुणांमध्ये उच्च शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प असून तेही पारंपरिक शिक्षण आहे. त्यामुळे खात्रीशीर रोजगार करता येत नाही.

४. अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाकडून मिळणारे कर्ज निधीच्या अभावामुळे फक्त झाडू, टोपल्या, वाजंत्री यासारख्या अल्प व तात्पुरत्या व्यवसाय साठीच मंजुर केले जाते. या व्यवसायातून फार मोठे आर्थिक उत्पन्न मिळते असे मात्र दिसून येत नाही.

५. स्वतःचे खाजगी उत्पन्नाचे साधन म्हणून शेती क्षेत्राकडे पाहिले जाते. परंतु या समाजात भूमीहीन यांचे प्रमाण सर्वात जास्त आहे. त्यामुळे या क्षेत्रातील मिळणाऱ्या खात्रीशीर उत्पन्नापासून तो पूर्णतः वंचित आहे.

६. हातमजुरी, शेतमजुरी हे व्यवसाय अल्प उत्पन्न गटातील असून हंगामी रोजगार देणारे आहे त्यातून मिळणारे उत्पन्न तुटपुंजे असते.

**उपाय योजना :-**

१. आज तरी ग्रामीण पातळीवर वास्तव्यास असणाऱ्या समाजासाठी खात्रीचे उत्पन्नाचे साधन म्हणजे शेती आहे. जे भूमिहीन मातंग समाजातील कुटुंबे आहेत, त्यांना शासनाकडून चार ते पाच एकर शेतजमीन वाटप करण्यात यावी.

२. आर्थिक-सामाजिक विकासाला चालना देणाऱ्या घटकांमध्ये उच्चशिक्षण आणि व्यावसायिक शिक्षणाचा समावेश अपरिहार्य आहे. मातंग समाजात उच्च व व्यावसायिक शिक्षणाचा प्रचार व प्रसार पाहिजे तेवढा झालेला दिसत नाही. उच्च तांत्रिक शिक्षण व व्यावसायिक शिक्षणाचा संबंध आर्थिक उत्पन्नही येत असतो. त्यासाठी मातंग समाजातील मुलांमध्ये उच्च शिक्षण व व्यावसायिक शिक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी या शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणे आवश्यक आहे.

३. मातंग जाती समूहातील जे विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊ इच्छितात, परंतु आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्यामुळे ते शहरी भागात राहणे त्यांना परवडत नाही. अशा सर्वच मातंग समाजातील विद्यार्थी विद्यार्थिनींची कॉलेज प्रवेशापासून तर त्यांच्या निवासापर्यंतचा सर्व खर्च शासनाने उचलावा.

४. तसेच जी मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृहे आहेत, त्यांची विद्यार्थी क्षमता संख्या वाढवावी. मागासवर्गीय वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना भोजनाचा खर्च हा रोख रकमेत त्यांना दिला जातो. हे धोरण शासनाने बंद करावे व पूर्वीसारखे वस्तीगृहातच शासनाने भोजनाची व्यवस्था करावी.

५. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाला शासनाकडून मिळणाऱ्या निधीत वाढ करावी व तो नियमित दिला जावा.

६. या विकास महामंडळाकडून कर्ज देताना जामीनदारांची अट घालण्यात आली आहे. बऱ्याच गरजूंना महामंडळाकडे कर्ज अर्ज करताना जामीनदार मिळत नाही. त्यामुळे त्यांना कर्जाची गरज असूनही जामीनदारांच्या अभावी अर्ज करता येत नाही. ही जामीनदारांची अट शिथिल करण्यात यावी.

७. समाजातील तरुणांनी स्वावलंबनासाठी स्पर्धेची मानसिकता व उद्योगशीलता जोपासली पाहिजे.

**संदर्भसूची :-**

१. Kanti Bajpai, The Idea of Human Security, International Studies, Sage Publication, New Delhi, Pp. 203-204.

२. NarottamGhan, Search for Human Security the Shifting Paradigm, Reference Press, New Delhi, Pp. 355, 2009.

३. UNDPReport, New York Press, Human Development Report, 1994.

४. NarottamGhan, उपरोक्त, पृ.क्र. ३५६.

५. डॉ. मिसाळ हनुमंत, महाराष्ट्रातील दलितांचे अंतरंग, प्रथम आवृत्ती,२००६,औरंगाबाद, पृ. क्र.३०.